# राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिनगारे, ठाकूर यांचे यश



यशस्वी खेळाडूंचा सत्कार करताना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील व इतर.

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

पतियाळा पंजाब येथे वेटलिफ्टिंग फेडरेशनच्या वतीने १० ते १२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ व कनिष्ठ गटाच्या राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विद्यार्थी वैष्णव ठाकूर याने ९६ किलो गटामध्ये सुवर्णपदक, तर सारिका शिनगारे हिने ४५ किलो गटात रौप्यपदक मिळविले. या खेळाडूंचा सन्मान खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या यशामुळे सारिका शिनगारे, वैष्णव ठाकूर यांची २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरदरम्यान पतियाळा येथे होणाऱ्या राष्ट्रीय शिबिराकरिता निवड झाली आहे. या शिबिरातून ऑक्टोबरमध्ये सिंगापूर येथे होणाऱ्या वरिष्ठ व कनिष्ठ गटाच्या कॉमनवेल्थ स्पर्धेकरिता भारतीय वेटलिफ्टिंग संघाची निवड होणार आहे.

या खेळाडूंना क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन केले. राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले. प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले. आभार प्रा. तानाजी पिंगळे यांनी मानले.